# कल्पनात्मक प्रेरणा(विघातक)

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. २७–१०–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

आत्मध्येयपूर्तीविषयी, लोकोद्धाराविषयी किंवा संशोधनाविषयी केलेल्या कल्पना या सकारात्मक असतात. त्यावर कृतित्मक विचार आणि कृती केली जाते. अर्थात त्याचं फलित हे कल्याणकारीच असतं. या 'विधायक'कल्पना असल्या तरी सद्य परिस्थितीत मानव 'विघातक'कल्पनांकडे झुकलेला आढळतो. या विघातक कल्पनांमुळे मानव आत्मघात तर करून घेतोच पण सर्वनाशालाही कारणीभूत ठरतो. जीवघेणी चुरस, न परवडणारी महागाई, न झेपणारी परिस्थिती आणि असुरक्षित जीवन यामुळे मानव अगदी मेटाकुटीला आला आहे. वरकरणी सुखी, समाधानी असल्याचा बुरखा जरी माणूस घेत असला तरी जगात तणावमुक्त, आनंदी व्यक्ती भेटणं दुरापास्त झालं आहे. खरं तर, मानवी देह हाच मुळी निसर्गाचा एक अनाकलनीय चमत्कार आहे. हा देह 'सेल्फ रिपेअरींग युनिट' आहे. छोटी–मोठी दुखणी तर तो औषधोपचार न करताही बरी करून घेतो. त्यातील पेशींचं कार्य अतिशय सुनियोजित आणि सूत्रबद्ध पद्धतीने चालू असतं. विघातक कल्पनांमुळे मनावर येणारे तणाव त्या पेशींवर दडपण आणतात आणि त्यांच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे देहातील अनैच्छिक क्रिया करणाऱ्या अवयवांवर हे तणाव जास्त विपरीत परिणाम करतात. अनैच्छिक क्रिया करणाऱ्या हृदय, फुफ्फुसं, जठर, पित्ताशय, यकृत, आतडी, मूत्रपिंड इत्यादींपैकी कशावरही तणावांमुळे विपरीत परिणाम झाला तर देह व्याधीरहित राहीलच कसा? इतकंच नाही, तर त्या तणावांचा विपरीत परिणाम मनावरही होतो. त्यामुळेच तर मनोरुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. केवळ मुंबईतच जवळ जवळ सतरा लाख मनोरुग्ण असून त्यापैकी साडेआठ लाखांहून अधिक मनोरुग्ण तरूण आहेत. क्षणोक्षणी येणाऱ्या छोट्या–मोठ्या मानसिक तणावांना तर आपल्याला सतत सामोरं जावं लागतंच आहे, पण त्याचबरोबर दीर्घकाळ टिकणाऱ्या आणि भेडसावणाऱ्या तणावांनाही सामोरं जावं लागतं. हे मानसिक तणावच मानवाच्या आत्मघाताला कारणीभूत ठरतात. आणि यातूनच आत्मघाती मानवी बॉम्ब तयार होतात. गर्दीच्या ठिकाणी किंवा महत्त्वाच्या ठिकाणांवर टाईम बॉम्ब अथवा कार बॉम्बने स्फोट घडवून शेकडो व्यक्ती मारून आपण आपल्या संघटनेची जगभर दहशत निर्माण करू शकू, या कल्पनेने दहशतवादी प्रेरित होतात. अती प्रभावी आणि जास्तीतजास्त शस्त्रास्त्रं निर्माण केली तर आपण जगावर साम्राज्य करू या कल्पनेने किंवा स्वसंरक्षणार्थ शस्त्रास्त्र निर्माण केली तर आपलं संरक्षण होईल या कल्पनेने जगात शस्त्रास्त्रांची चुरस सुरू आहे. जर तिसरं महायुद्ध झालं आणि सर्व राष्ट्रांनी आपापली शस्त्रास्त्रं वापरली तर पृथ्वी बेचिराख होईल. हा सगळा विघातक कल्पनांचाच परिणाम. कृतित्मक आणि कल्पनात्मक प्रेरणांप्रमाणेच भावनात्मक प्रेरणाही तेवढ्याच महत्त्वाच्या असतात. त्याविषयी पुढच्या भागात जाणून घेऊया.